नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २२/०६/२०२६ (सोमवार )

## बकरी चोरीचे १२ गुन्हे उघड, ३ आरोपी अटक, वाहनासह एकुण ४ लाख ५१ हजारांचा मुद्देमाल जप्त स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांची कामगिरी

मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण आणि श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक २१/०६/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने १२ बकरी चोरीच्या गुन्हयाची उकल केली आहे.

स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण यांचे पथक उघड न झालेल्या गुन्हयांचा समांतर तपास करीत असताना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सायबर पोलीस स्टेशन, नागपूर ग्रामीण यांच्या सहकार्याने तांत्रिक विश्लेषण, गोपनीय माहितीच्या आधारे तपास केला. दिनांक २१/०६/२०२६ रोजी नमुद पथकाला बकरी चोरी करणारे आरोपी हे गुमथाळा परीसरात फिरत असल्याची माहीती प्राप्त झाली. पोलीसांनी तात्काळ सदर ठिकाणी आरोपींचा शोध घेवुन **१) जावेद उर्फ सोनु जुल्फीकार अन्सारी, वय ३७ वर्ष, रा. नवीन वस्ती टेका नाका, गोसमंडी जवळ, नागपूर, २) रोहीत अशोक खोब्रागडे, वय ३७ वर्ष, रा. विनोबा भावे नगर, यशोदरा नगर, नागपूर आणि ३) समीर शरीफ शेख, वय ३० वर्ष, रा. नवीन वस्ती, टेका नाका, नागपूर** यांना **कार क्रं एम एच ०१ ए आर ४०१२ या वाहनासहीत** ताब्यात घेतले. नमुद तिन्ही आरोपी कडे कौशल्यपुर्ण विचारपुस केली असता त्यांनी मिळुन केलेल्या १२ चोरीच्या गुन्हयांची माहीती दिली.

**पोलीसांनी नमुद आरोपींकडुन चोरी करण्याकरीता वापरलेली ह्युंडाई आय २० कार क्रं एम एच ०१ ए आर ४०१२ किमती २,००,०००/—रूपये, ३ मोबाईल किंमती**

२२,०००/— रूपये आणि चोरीच्या बकऱ्या विक्री करून मिळवलेले २,२९,०००/— रूपये रोख रक्कम असा एकुण ४,५१,०५० /— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. तिन्ही आरोपींना अटक करण्यात आली आहे.

उघड झालेले गुन्हे

१) पो स्टे वडोदा अप क्रं १९६/ २६ कलम ३०३ (२) भान्यासं

२) पो स्टे वडोदा अप क्रं १७७/ २६ कलम ३०३ (२) भान्यासं

३) पो स्टे केळवद अप क्रं ५५/२६ कलम ३०३ (२) भान्यासं

४) पो स्टे केळवद अप क्रं ११६/ २६ कलम ३०३ (२) भान्यासं

५) पो स्टे केळवद अप क्रं २००/ २६ कलम ३०३ (२) भान्यासं

६) पो स्टे खापा अप क्रं १२९/ २६ कलम ३०३ (२) भान्यासं

७) पो स्टे कळमेश्वर अप क्रं ४३१/ २६ कलम ३०३ (२) भान्यासं

८) पो स्टे कळमेश्वर अप क्रं ५६७/ २६ कलम ३०३ (२) भान्यासं

९) पो स्टे कन्हान अप क्रं १६/ २६ कलम ३०३ (२) भान्यासं

१०) पो स्टे नरखेड अप क्रं ४१२/ २६ कलम ३०३ (२) भान्यासं

११) पो स्टे नरखेड अप क्रं ४७८/ २६ कलम ३०३ (२) भान्यासं

१२) पो स्टे रामटेक अप क्रं १८६/ २६ कलम ३०३ (२) भान्यासं




# प्रतिबंधीत सुगंधित तंबाखुची विक्रीसाठी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद,
# ११ लाख ४२ हजार ८८६ रूपयांचा मुद्देमाल जप्त
# नरखेड पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन नरखेड** :— दिनांक २१/०६/२०२६ रोजी नरखेड पोलीस पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदारद्वारे माहिती मिळाली की, चारचाकी वाहनाने अवैधरित्या प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखुची वाहतुक होत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी पोलीस स्टेशन नरखेड हद्दीतील मौजा पिपळा कोठा ते आग्रा रोड शेमडा शिवार येथे नाकाबंदी केली नाकाबंदी दरम्यान संशयित वाहन क्र. एम एच ३४/ए जे ४५४५ हे वाहन मिळुन आले. पोलीसांनी वाहन थांबविण्याचा इशारा केला असता यातील कार चालकांनी पोलीसांना पाहुन दुर अंतरावर वाहन थांबवुन घटनास्थळाहुन पळुन गेला. नमुद वाहनाची तपासणी केली असता प्रतिबंधीत असलेला सुंगधीत तंबाखु मिळुन आला.

**पोलीसांनी पंचासमक्ष वेगवेगळया कंपनीचा २१८.३७ किलोग्रॅम सुगंधित तंबाखु एकुण किंमती १,३२,८८६/— रूपये वाहन क्र. एम एच ३४/ए जे ४५४५ किंमती १०,००,०००/—रूपये, ०१ ॲडरॉईड मोबाईल किंमती १०,०००/—रूपये असा एकुण**

११,४२,८८६/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नमुद आरोपी नामे १) अजय जानराव बिघाने, रा.आग्रा, तह. नरखेड आरोपी क्र. २) मुकेश शाहु, रा. कळमना मार्केट, नागपुर यांनी सदर प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु मानवी जिवीतास अपायकारक आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने त्याचे उत्पादन, विक्री, साठा व वाहतुकीवर प्रतिबंध लावलेला आहे हे माहीती असतांना सुध्दा प्रतिबंधीत अन्नपदार्थाची विक्री करण्याच्या हेतुने साठा व वाहतुक केली आहे. नमुद आरोपीतांविरूद्ध पोस्टे नरखेड येथे भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम १२३, २७४, २७५, २२३ सह कलम अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे.



# अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद. ३ लाख ८३ हजारांचा मुद्देमाल जप्त पाचगाव पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन पाचगाव** :— दिनांक २१/०६/२०२६ रोजी पाचगाव पोलीसांना गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा धामना शिवारात सेंट पॉल शाळेच्या समोर नाल्याच्या बाजूला असलेल्या खाली ले आऊट मध्ये झाडी झुडुप असलेल्या जागेत काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पाचगाव पोलीस घटनास्थळी पोहचले असता, नमुद घटनास्थळी काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना दिसुन आले. पोलीसांनी **आरोपी नामे १) १) अब्दुल फहीम अब्दुल रहमान, वय ३७ वर्षे, रा. बडा ताजबाग, नागपुर, २) सज्जाद हुसैन सरफराज हुसैन, वय २२ वर्षे, रा. अयोध्या नगर, नागपुर, ३) शाकीर करीम शेख, वय ३३ वर्षे, रा. कळमेश्वर, ४) शेख तब्बु शेख रहीम, वय २८ वर्षे, रा. ताजबाग नागपुर ५) अब्दुल मोहीम अब्दुल जब्बार, वय २२ वर्षे, रा. बडा ताजबाग नागपुर ६) मोहम्मद शाहरूख मोहम्मद हुसैन, वय २८ वर्षे, रा. बडा ताजबाग, नागपुर ७) रमीज बेग युसुफ बेग, वय ३४ वर्ष, बडा ताजबाग नागपूर** यांना जागीच पकडले.

**पोलीसांनी घटनास्थळावरून १) ५२ तासपत्ते व रोख रक्कम ४२००/— रूपये २) ६ मोटरसायकल किंमती ३,८३,०००/—रूपये असा एकुण ३,८७,२००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नमुद ०७ आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन पाचगाव येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**




# अल्पवयीन अपहृत मुलीचा घेतला शोध
# कळमेश्वर पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे दिनांक १७/०४/२०२६ रोजी अप क्र ३९५/२०२६ कलम १३७ (२) भा.न्या.सं अन्वये दाखल गुन्हयातील अल्पवयीन अपहृत मुलगी हीचा शोध लागत नव्हता. मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण आणि श्री सागर खर्डे, सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, काटोल यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री मनोज काळबांधे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन कळमेश्वर यांच्या नेतृत्वात तपास पथक यांनी सदर गुन्हयाचा सखोल तपास केला. दिनांक २२/०६/२०२६ रोजी गोपनिय माहीती आणि तांत्रिक माहीतच्या आधारे नमुद गुन्हयातील अपहृत मुलगी ही उज्जैन, मध्यप्रदेश येथे असल्याची खात्रीशिर माहीती प्राप्त केली. सदर मुलीस ताब्यात घेतले असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास कळमेश्वर पोलीस करीत आहेत.

# हद्दपार आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन उमरेड :—** दिनांक २१/०६/२०२६ रोजी उमरेड पोलीस पेट्रोलींग करीत असतांना **आरोपी विजय श्रावण राठोड, वय ४५ वर्ष, रा. मसाळा, उमरेड हा गोधनी मसाळा उमरेड** हा उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय उमरेड याच्या आदेशाने दिनांक २५/०५/२०२६ पासुन नागपुर जिल्हयातुन हददपार बाबत आदेशीत असुन सुदधा सदर आरोपी उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय उमरेड याच्या आदेशाचे उल्लंघन करुन नागपुर ग्रामीण हददीत त्याच्या राहते गावी घरी हजर मिळुन आला.

**नमुद आरोपी विजय श्रावण राठोड, वय ४५ वर्ष, रा. मसाळा, उमरेड हा गोधनी मसाळा उमरेड याचेविष्ध्द कलम १४२ मपोका. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

# अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध १२ गुन्हे नोंद

दिनांक २१/०६/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन मोहाफुल दारू, देशी दारू, मोहाफुल रसायन सडवा, ताडी, देशी दारू, विदेशी दारू, इतर साहित्य असा एकुण ७७,२७०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण १२ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन देवलापार** येथे आरोपी १) किशोर तिलकचंद पारखी, वय ३९ वर्ष, रा पिडंकापार, ता. रामटेक २) महिला आरोपी यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे २ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन जलालखेडा** येथे आरोपी गोपागोनी कनकैय्या रामास्वामी, वय ५५ वर्षे, रा. नेरमेट्टा, जि. वरंगल राज्य तेलंगणा, ह.मु. महादेव चवरे हयांचे घरी किरायाने, वार्ड नंबर ३, जलालखेडा याचेवर १ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन काटोल** येथे आरोपी १) कपील राधेशाम जैस्वाल, २) अशिष अशोक नंदेश्वर दोन्ही रा कचेरी सावंगा ता काटोल जि नागपुर याचेवर १ गुन्हा नोंद. तसेच आरोपी कपील राधेशाम जैस्वाल याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन**

**कोंढाळी** येथे आरोपी बबलु गोंविदरावजी इरपाते, वय ५२ वर्ष, रा. संगमेश्वर मंदिर झासीराणी चौक नागपुर याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन नरखेड** येथे आरोपी बबलु मुस्तफा शेख, वार्ड क्र ०५ सावरगाव ता नरखेड याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन केळवद** येथे आरोपी १) सुकरेव गौतुजी बागडे वय ६० वर्ष रा. मंगसा ता. सावनेर २) महिला आरोपी यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे २ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन खापा** येथे महिला आरोपी हिचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन पाचगाव** येथे आरोपी बेलन शिवसागर रजपुत, वय ४८ रा. चांपाबेडा तह. उमरेड जि. नागपुर याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन वडोदा** येथे आरोपी विनोद गेंदलाल ढोके, वय ५० वर्षे, रा कढोली वार्ड क्र १, ता. कामठी याचेवर १ गुन्हा नोंद,

**नमुद कारवाईत एकुण १८ लिटर मोहाफुल दारू, १२०० लिटर मोहाफुल सडवा, १३५.५ लीटर ताडी, ४०५० मिली देशी दारू, २५०० मिली विदेशी दारू, इतर साहित्य असा एकुण ७७,२७०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने